रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर.

इतिहास विभाग

२०२४-२५

शैक्षणिक सहल अहवाल

अण्णासाहेब आवटे महाविद्यलयातील इतिहास विभागाची शैक्षणिक सहल सोमवार दि. ३१ मार्च आणि मंगळवार दि.०१ एप्रिल २०२५ रोजी सुवर्ण गणेश मंदिर (दिवे आगार) आणि रायगड किल्ला येथे गेली. सोमवार दि. ३१ रोजी दुपारी ०२:०० वाजता 'सुवर्ण गणेश मंदिर' यथे भेट दिली. मंदिर स्थापत्याकालेची महत्वपूर्ण माहिती तसेच मंदिराचा इतिहास याबद्दल विद्यार्थ्यांनी समजावून घेतली. तसेच स्थानिक लोक जीवन, राहणीमान, बोलीभाषा याबद्दल विद्यार्थ्यांनी माहिती घेतली. अत्यंत प्रशस्त असे मंदिर आणि प्रसन्न असे वातावरण त्या ठिकाणी होते.

०१ एप्रिल २०२५ रोजी दुस-या दिवशी दुपारी १२:०० वाजता रायगड किल्ल्याला भेट दिली. रायगड किल्ल्यावरील छ. शिवाजी महाराजांच्या समाधीबाबत माहिती जाणून घेतली. गडावरील तुळजाभवानी मंदिराला भेट देऊन मंदिर स्थापत्याकालेची माहिती समजावून घेतली. गडावरील पाण्याचे टाके त्याचा तत्कालीन काळात होणारा उपयोग तसेच, धान्य कोठारे, भाजी मांडी, हिरकणी कडा, टकमक टोक इत्यादी ठिकानांना भेट दिली. तसेच रायगड किल्ल्याचे बांधकाम करणारे अभियंते हिरोजी इंदुलकर यांच्याबद्दल माहिती घेतली.



सुवर्ण गणेश मंदिरास भेट (३१ मार्च २०२५)



दिवे आगार बीच (३१ मार्च २०२५)



रायगडचा इतिहास समजावून घेताना विभागातील विद्यार्थी (१ एप्रिल २०२५)